महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १६५ वे | दिनांक : १०/०६/२०२६ | वार : बुधवार

## मोदींनी देशाची अर्थव्यवस्था मजबूत केली : टीका करणाऱ्या राहुल गांधींनी एक वर्ष तरी देशात राहून दाखवावे - एकनाथ शिंदे



**मुंबई** : महाराष्ट्रात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना शिंदे गटातील नेत्यांची बैठक घेतली. या बैठकीनंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत विविध मुद्यांवर भाष्य केले आहे. यावेळी बोलताना शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. तसेच राहुल गांधी यांच्यावर देखील टीका केली आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री मोदी यांनी यशस्वी कारकीर्द गाजवलेली आहे. एकही सुट्टी न घेता काम करणारे प्रधानमंत्री म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्याचबरोबर 2024 नंतर या देशाला प्रगती पथावर नेण्याचे काम त्यांनी केले आहे. आपली अर्थव्यवस्था मजबूत केली. इतर देशांची अर्थव्यवस्था डबघाईला आलेली असताना आपली अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावर आणली. 2014 पूर्वीची परिस्थिती जर आपण पाहिली तर विविध घोटाळे आपण पाहिले. परंतु मोदींच्या कार्यकाळात त्यांना एकही डाग लावण्याचे काम कोणी करू शकले नाही.

देशाचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी देशाची परिस्थिती बिकट असल्याचे म्हटले होते. तसेच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील टीका केली होती. यावर विचारले असता एकनाथ शिंदे म्हणाले, राहुल गांधी नेहमीच देशाच्या विरोधात आरोप लावत असतात. देशात असतात तेव्हा देखील आरोप करत असतात, देशाच्या बाहेर जातात तेव्हा देखील आरोप करतात. ऑपरेशन सिंदूरमध्ये लढलेल्या सैनिकांच्या विरोधातही ते बोलतात. आता ते म्हणाले की पंतप्रधान मोदी एक वर्षानंतर पंतप्रधान नाही राहणार, मी तर म्हणतो, ते एक वर्षच नाही ते येणारे अनेक वर्षांपर्यंत या देशाचे नेतृत्व करतील. माझे एकच म्हणणे आहे राहुल गांधींना की तुम्ही एक वर्ष सातत्याने देशात तरी राहून दाखवा, असे आवाहन शिंदे यांनी केले आहे.

इंडिया आघाडीची बैठक झाली. त्यात शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मागणी केली की इंडिया आघाडीकडून पंतप्रधान पदासाठी चेहरा घोषित करा. यावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, एनडीएकडे चेहरा आहे नरेंद्र मोदी. पण त्यांच्याकडे कोणता चेहरा आहे? त्यांच्यात एवढे मतभेद आहेत. इंडिया आघाडीमध्ये जे जातात ते पराभूत होतात. त्यामुळे ते सगळे इंडिया आघाडीमधून अनेक पक्ष बाहेर पडत आहेत. अजून एक कोणीतरी ऑनलाइन आले, फेसबुक लाईव्ह करायला आले, असे म्हणत शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता टीका केली आहे.

बच्चू कडू यांनी म्हटले होते की एकनाथ शिंदे यांनी पुन्हा मुख्यमंत्री व्हावे, यावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, बघा आता ही वेळ आहे का? आता काही जागा रिक्त आहे का? आहे का? मी जेव्हा मुख्यमंत्री होतो, तेव्हा देवेंद्र फडणवीस आणि आम्ही एक टीम म्हणून काम करत होतो. आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत आणि आम्ही सगळे टीम म्हणून काम करत आहोत. आमच्यात चांगले बॉंडिंग आहे. हे बॉंडिंग कायम राहणार आहे. कार्यकर्त्यांची भावना असते, ते बोलून जातात. मी खुर्चीसाठी लढत नाही. आमचा अजेंडा खुर्ची नाही, आमचा अजेंडा हा महाराष्ट्राच्या जनतेची सेवा करणे आहे. त्यामुळे आमच्यात चांगली बॉंडिंग आहे आणि जिथे कुठे आमच्या आमदार आणि खासदारांना जिथे कुठे त्रास असेल तिथे आम्ही आणि मुख्यमंत्री बसून चर्चा करू, असे शिंदे यांनी म्हटले आहे.

## अब्दुल सत्तारांच्या मुलाचा जिल्हा बँकेसाठी अर्ज बाद

**छत्रपती संभाजीनगर** : विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बंडखोरीची तलवार म्यान करणाऱ्या शिवसेना नेते अब्दुल सत्तार यांना आता आणखी एक मोठा राजकीय धक्का बसला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा बँक निवडणुकीत त्यांचे सुपुत्र समीर सत्तार यांचा उमेदवारी अर्ज अत्यंत क्षुल्लक कारणावरून अवैध ठरवण्यात आला आहे. या कारवाईवर तीव्र नाराजी व्यक्त करत, यामागे नेमके कोणते राजकारण दडले आहे हे सांगणे कठीण असल्याचे सत्तार यांनी म्हटले आहे. तसेच, या संदर्भात आपण राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी सविस्तर चर्चा करणार असून, देवेंद्र फडणवीस आपल्याला नक्कीच योग्य तो न्याय देतील, असा विश्वासही अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला आहे.

समीर सत्तार यांचा उमेदवारी अर्ज अत्यंत क्षुल्लक कारणावरून अवैध ठरवण्यात आल्याचा दावा शिवसेना नेते अब्दुल सत्तार यांनी केला आहे. प्रशासनाने दिलेल्या कारणानुसार, ज्या जागेवरून व्यवस्थापन केले जाणार आहे ती जागा भाड्याने दिलेली असल्याचा ठपका ठेवून हा अर्ज बाद करण्यात आला आहे. मात्र, यावर आक्षेप घेत सत्तार यांनी स्पष्ट केले की, मुळात नियम 58 नुसार ते सदस्यच नसल्यामुळे ही अट त्यांना लागू होत नाही. त्यामुळे केवळ या तांत्रिक मुद्द्यावर उमेदवारी नाकारणे हे पूर्णपणे चुकीचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या कारवाईमागे नेमके कोणते राजकारण दडले आहे हे आताच सांगता येणार नाही, अशी शंकाही अब्दुल सत्तार यांनी उपस्थित केली आहे. याप्रकरणी आपण लवकरच राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः वकील असल्याने त्यांना कायद्याची आणि नियमांची सखोल माहिती आहे, त्यामुळे ते या प्रकरणात लक्ष घालून नक्कीच योग्य तो न्याय देतील, अशी अपेक्षा सत्तार यांनी व्यक्त केली आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा बँक निवडणुकीत अब्दुल सत्तार यांचे सुपुत्र समीर सत्तार यांच्यासह माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांच्या कन्या व कन्नडच्या शिवसेना आमदार संजना जाधव यांचाही उमेदवारी अर्ज बाद ठरवण्यात आला आहे. अर्जामध्ये केवळ किरकोळ चुका काढून हे अर्ज जाणीवपूर्वक अवैध ठरवण्यात आल्याचा गंभीर आरोप आता शिवसेनेकडून केला जात आहे. एकाच वेळी दोन मोठ्या नेत्यांच्या वारसदारांना असा धक्का बसल्यामुळे, या मुद्द्यावरून आता महायुतीत म्हणजेच भाजप आणि शिवसेनेत नव्या वादाला तोंड फुटण्याची दाट शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

जिल्हा सहकारी बँकेचा निवडणूक कार्यक्रम 1 जून रोजी जाहीर झाला असून, येत्या 8 जुलै रोजी यासाठी प्रत्यक्ष मतदान पार पडणार आहे. निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यापासून संचालकपदासाठी एकूण 214 उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले होते, ज्यामध्ये अनेक मंत्री, आमदार आणि खासदार यांच्या मुलांसह दिग्गज नेत्यांचाही मोठ्या प्रमाणावर समावेश होता. मात्र, अर्जांच्या छाननी प्रक्रियेदरम्यान या सर्व दिग्गजांपैकी समीर सत्तार आणि आमदार संजना जाधव या दोन महत्त्वाच्या उमेदवारांचेच अर्ज बाद झाल्याने या निवडणुकीत मोठी खळबळ उडाली आहे.

## शिर्डीत साईभक्तांच्या आरोग्याशी खेळ : तुकाराम मुंढेंचा मोर्चा शिर्डीकडे



**शिर्डी** : साईबाबांच्या शिर्डीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या आरोग्याशी प्रसादाच्या नावाखाली आरोग्याशी खेळ सुरू असल्याचे उघडकीस आले आहे. मंदिर परिसरातील शेकडो दुकानांमध्ये भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांची विक्री होत असल्याचे समोर आले आहे. काही भाविकांनी बुरशीयुक्त पेढ्यांबाबत तक्रारी केल्यानंतर, अन्न आणि औषध प्रशासन तातडीने खडबडून जागे झाले असून त्यांनी 'ॲक्शन मोड'मध्ये येत शिर्डीत या दुकानांवर धडक कारवाईला सुरुवात केली आहे.

शिर्डीमध्ये दररोज हजारो आणि वर्षाकाठी लाखो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी येतात आणि मंदिराबाहेरील खाजगी दुकानांमधून श्रद्धेने प्रसादाची खरेदी करतात. मात्र, या दुकानांमध्ये विकल्या जाणाऱ्या पेढ्यांवर ना पॅकेजिंगची तारीख असते, ना 'एक्सपायरी डेट' दिलेली असते. शिवाय, हे पेढे नेमके कुठे आणि कोण बनवते, याचाही कोणताही उल्लेख पाकिटांवर नसतो. अनेक वर्षांपासून भाविकांना अक्षरशः दगडासारखे कडक आणि पाकिटात बुरशी लागलेले पेढे प्रसादाच्या रूपात विकले जात असल्याचा भयंकर प्रकार आता उघड झाला आहे.

प्रसादाच्या नावाखाली सुरू असलेल्या या प्रकारामुळे लाखो साईभक्तांच्या जिवाशी थेट खेळ सुरू आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे शिर्डी नगरपालिका आणि अन्न व औषध प्रशासनाचे आतापर्यंत पूर्णपणे दुर्लक्ष झाले होते. श्रद्धेच्या नावाखाली दिल्या जाणाऱ्या या निकृष्ट आणि बुरशीयुक्त प्रसादावर भाविकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, प्रशासनाच्या या हलगर्जीपणामुळे भक्तांच्या आरोग्याशी सुरू असलेला हा जीवघेणा खेळ नेमका कधी थांबणार? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

राज्यात अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाची सूत्रे हाती घेताच सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी भेसळखोरांविरोधात राज्यभर धडक मोहीम हाती घेतली आहे. याच पार्श्वभूमीवर, शिर्डीत साईभक्तांना प्रसादाच्या नावाखाली बुरशीयुक्त पेढ्यांची विक्री होत असल्याच्या गंभीर तक्रारी प्राप्त होताच प्रशासनाने तत्काळ दखल घेतली. या तक्रारींनंतर अन्न व औषध प्रशासनाचे विशेष पथक तातडीने शिर्डीत दाखल झाले असून, त्यांनी या धक्कादायक प्रकाराविरोधात थेट ॲक्शन मोडमध्ये येत कारवाईला सुरुवात केली आहे.

या धडक कारवाईअंतर्गत साई मंदिर परिसरातील प्रसादाच्या दुकानांवर पथकाकडून छापेमारी सुरू असून, संशयित पेढ्यांचे नमुने गोळा केले जात आहेत. हे सर्व नमुने प्रयोगशाळेत सखोल तपासणीसाठी पाठवण्यात येणार असून, अहवालात दोष आढळल्यास संबंधित पेढा उत्पादकांवर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. सध्या प्रसाद विक्रेत्यांकडून या पेढ्यांच्या मूळ उत्पादकांची सविस्तर माहिती काढली जात असून, प्रशासनाच्या या आक्रमक पावलांमुळे शिर्डी परिसरातील भेसळखोरांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० जून २०२६


## प्राचार्य केशव भांगे यांचा वाढदिवस-अभिष्टचिंतन सोहळा संपन्न



**शिरूर कासार :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर(का.)जि.बीड येथे कार्यरत असणारे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या वाढदिवस-अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला.आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री जयदत्त(अण्णा) क्षीरसागर यांनी आपल्या संस्थेमधील, कालिकादेवी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,हे जिल्ह्यातील सर्वात मोठे युनिट आहे.हे युनिट चालवण्याची जबाबदारी प्रदीर्घ अनुभव असलेल्या प्राचार्य केशव भांगे साहेब,यांच्यावर सोपवली.आणि श्री भांगे साहेबांनी आपल्या कर्तुत्वाच्या बळावर स्वतःचा भांगे ब्रँड काय असतो,ते 'श्री कालिका पॅटर्न' च्या माध्यमातून दाखवून दिले.विद्यालयातील अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेमध्ये प्रथम प्राविण्य मिळवून झळकू लागले. विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांनी विद्यालयाचा लौकिक वाढविला. विभाग व जिल्हास्तरावर गुणवत्तेची झलक दाखवून दिली.ही किमया प्राचार्य केशव भांगे साहेबांचीच,त्यांनी कालिकादेवी विद्यालयाची,एक नवी ओळख संपूर्ण तालुका व पंचक्रोशीतील सुज्ञ जणांना करून दिली.प्रशासन आणि अध्यापनामध्ये जिथे-जिथे उणीव दिसून आली;तिथे-तिथे त्यांनी कोणाचाही मुलाहिजा न ठेवता संबंधितांना खडसावून सांगितले.म्हणजेच एक खंबीर अर्थात(खमक्या)नेतृत्व कसे असते ते दाखवून दिले.शिक्षण क्षेत्रात प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर प्रशासन हाताळण्याची कसोटी आणि कसंब कसे असावे याचा एक वस्तूपाठ दिला.बडवेगिरीला,चमचेगिरीला व कामचुकारांना त्यांनी अजिबात थारा दिला नाही.मात्र प्रामाणिकपणे काम करणाऱ्याचे मनापासून कौतुक करून त्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप दिली.त्यांचे व्यक्तिमत्व चंचल,आक्रमक,आणि सडेतोड जरी असले,तरी तितकेच प्रेमळ,दिलखुलास आणि मनमिळावू आहे.कदाचित कुणाला रागीट व संतापजनक वाटत असले तरी,आजपर्यंतच्या कारकिर्दीत त्यांनी एखाद्या कर्मचाऱ्यांचे किंवा त्याच्या कुटुंबाचे संपूर्ण जीवन उध्वस्त केल्याचे ऐकिवात नाही.म्हणून त्यांच्या या उद्धार व कारुण्यमय अंतकरणाचे कौतुक करून त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. बसवेश्वर देशमाने,परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे, वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. अशोक घोळवे, प्रा.बिभीषण घायाळ, प्रा. घनश्याम चव्हाण, प्रा. महादेव हंगे, प्रा.विनोद गलांडे, प्रा.बाळासाहेब खटाणे,श्री नंदकुमार जाधव. श्री विलास कांबळे यांची उपस्थिती होती. येथून पुढे सुद्धा त्यांच्या हातून सत्कार्य घडो. त्यांच्या मनातला संकल्प पूर्णत्वास जावो. यासाठी प्राचार्य केशव भांगे साहेबांना सुख, समृद्धी, समाधान, भरभराट, आनंदी आणि आरोग्यदायी जीवन मिळो. अशी सर्वांनीच मनोकामना व्यक्त करून भविष्याच्या वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

तेव्हा वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेला अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

## गोषेगाव येथे बियाणे उगवण क्षमता प्रात्यक्षिक यशस्वीरीत्या संपन्न



**गोषेगाव :** पाणी फाउंडेशन 'सत्यमेव जयते फार्मर कप' (Farmer Cup) ही राज्यस्तरीय स्पर्धा राबवत आहे, ज्या अंतर्गत या शेतीशाळांचे आयोजन मोठ्या प्रमानात केल्या जाते यात पूर्व मशागत, पिकांचे व्यवस्थापन, सेंद्रिय खते तयार करणे,काढणी ते थेट मार्केटिंगपर्यंतच्या सर्व टप्प्यांवर सखोल माहिती दिली जाते गोषेगाव येथे कृषिसमृद्धी शेतकरी गट बीज उगवणक्षमता बीजप्रक्रिया प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. या प्रात्यक्षिकामध्ये बीजप्रक्रियेचे महत्त्व, योग्य पद्धती आणि त्याचे फायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून प्रात्यक्षिकाचा लाभ घेतला. यामुळे शेतकऱ्यांमध्ये बीजप्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण होऊन आधुनिक व शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार होण्यास मदत झाली.बियाणे उगवण क्षमता चाचणी, हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्याचा वापर, रुंद सरी वरंबा पद्धतीने सोयाबीन पीक लागवड इत्यादी बाबत प्रात्यक्षिक तसेच मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी उप कृषि अधिकारी सुसर साहेब सहाय्यक कृषि अधिकारी अमोल वाघमारे, मोरे साहेब आत्मा विभाग धर्यशील पाटील साहेब व गटातील सर्व शेतकरी हजर होते.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० जून २०२६


# कॉक्रोच

कॉक्रोच जनता पार्टी
साऱ्या जगात दूमदुमली
जंतर-मंतरच्या आंदोलनाने
सत्ताधाऱ्यांची सारी दणाणली

रडते जेव्हा मुल
तेव्हाच आई पाजते पान्हा
अंदाधुंद व्यवस्थेविरुद्ध बोलतो तरूण
' कॉक्रोच ' म्हणून हिणवले जाते

न्याय देणाऱ्या न्यायधिशाच्या मुखात
एवढी घृणा तरूणाविषयी
सरकारचा सारा भोंगळ कारभार
जातीयवादी न्यायधिशांचा चकार शब्द नाही

केले आंदोलन तरुणांनी
शिक्षणमंत्र्याचा राजीनामा द्या म्हणोंनी
सरकार घालते भ्रष्टतेला पाणी
आंदोलनाचे त्यांना देणेघेणे नाही

सरकारी यंत्रणा इतकी भ्रष्ट
लाखो तरुणांचे आयुष्य केले उद्ध्वस्त
तुम्ही मात्र चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे पुजारी
न्याय मागणारे तरुण मात्र अराजक

आवाज उठवणारे,आंदोलन करणारे
म्हणे हे सारे अराजकता माजवणारे
सत्तेतील भ्रष्ट,घाणेरडे सारे
म्हणे आम्ही धुतल्या तांदळासारखे ?

बाबासाहेबांचे पुस्तक हातात घेऊन
केलेले आंदोलन फार जिव्हारी लागले
तुम्ही खोटे खोटे संविधानप्रेमी
सारे संविधानच बदलाय निघाले

एससी एसटी ओबीसी भटके
सा-यांना तुम्ही केले उद्ध्वस्त
महागाईने, बेरोजगारी,अन्यायाने कंबरडे मोडले
तरी म्हणे गप्प बसा रे सारे

ना खाऊंगा ना खाने दुंगा
बटेंगे तो कटेंगे,सबका साथ सबका विकास
या घोषणांनी साऱ्यांचे कान फाटले
देशातील सा-या जनतेचे जिने तुम्ही इटविले

कॉक्रोच जनता पार्टी
शिक्षण,बेरोजगारी,अन्यायाचा आवाज
तिला इतके बदनाम केले
जणू आम्हीच भारताचे भाग्यविधाते !

हिंदू हिंदू म्हणून
हे इतके छळतात सगळ्याच लोकांना
जे खोटे खोटे आहे
त्यालाच खरे म्हणा म्हणतात लोकांना




**प्रा. डॉ. सतीश मस्के**
मराठी विभागप्रमुख,
कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय,
पिंपळनेर ता. साक्री जि धुळे 424306
मो.9423397484


# शासनाच्या तीन महिन्यांच्या रेशन आदेशालाही हरताळ

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील तब्बल ४५ स्वस्त धान्य दुकाने मे महिन्यापासून शासनाच्या धान्य पुरवठ्याअभावी रिकामी पडली असून, अनेक गावांतील हजारो रेशनधारक नागरिकांना अन्नधान्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. शासनाने तीव्र उष्णतेची लाट लक्षात घेता लाभार्थ्यांना तीन महिन्यांचे रेशन एकत्रित देण्याचे आदेश दिले होते. मात्र प्रत्यक्षात मे महिन्याचे धान्यच उपलब्ध न झाल्याने शासनाच्या आदेशांची अंमलबजावणी कागदावरच राहिल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.जून महिन्यात तापमानाचा पारा 42% चढलेला असताना ग्रामीण भागातील गरीब व सर्वसामान्य नागरिकांना रेशनसाठी वारंवार दुकानांवर चकरा माराव्या लागत आहेत. “धान्य आलेले नाही”, “गोदामातून पुरवठा झालेला नाही” अशी उत्तरे दुकानदारांकडून दिली जात असल्याने लाभार्थ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.विशेषतः अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील नागरिकांचे हाल होत आहेत. शासनाने उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा मिळावा म्हणून तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी वितरित करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र जिंतूर तालुक्यातील अनेक दुकानांवर मे महिन्याचे रेशनच पोहोचल्याने लाभार्थ्यांना शासनाच्या घोषणांचा कोणताही फायदा झालेला नाही.तालुक्यातील. हंडी, धमधम ,वझर बु,धानोरा बु, वडी, घागरा ,कावी, सक्राळा, कोळपा, बामणी, वाघे धानोरा,चौधरी ,कवठा बदनापूर, अंबरवाडी,देहगाव, बोरगळ वाडी, हनवत खेडा, कुऱ्हाडी ,अंगलगाव ,अंगलगाव तांडा ,कोठा, मालेगाव जिंतूर ,जाम बुद्रुक, भिलाज, सुकळी-वाडी, माथला,घेवडा,अकोली, खरदडी,डोंगरतळा, इटोली, तांडा, दिग्रस, दाभा, वस्सा,सह या गावांमध्ये मे महिन्याचे रेशन अद्यापही पोहोचले नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या गावांतील नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक गावांमध्ये महिला लहान मुलांसह रेशन दुकानांवर तासन्तास प्रतीक्षा करत असून, रिकाम्या हाताने परतण्याची वेळ त्यांच्यावर येत आहे. “रेशन कधी मिळणार याची कोणतीही स्पष्ट माहिती मिळत नाही. प्रत्येक वेळी फक्त उद्याची तारीख दिली जाते,” अशी नाराजी नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, रेशन दुकानदारांनीही पुरवठा विभागाकडून धान्य वेळेवर उपलब्ध होत नसल्याचे सांगितले.

गोदामातून पुरवठा रखडल्याने दुकानदारांनाही नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. तालुक्यात निर्माण झालेल्या या गंभीर परिस्थितीकडे जिल्हा प्रशासन व अन्न नागरी पुरवठा विभागाने तातडीने लक्ष देऊन रखडलेला धान्य पुरवठा त्वरित सुरू करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा काही ग्रामस्थ व रेशनधारकांनी दिला आहे.

# आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा दि. १० जून रोजी वर्धापन दिन समारंभ

**नाशिक :** (दि.०९) - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २८ वा वर्धापन दिन समारंभ बुधवार, दि. १० जून, २०२६ रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे (अतिरिक्त कार्यभार), यांच्या अध्यक्षेतेखाली तसेच प्रमुख अतिथी म्हणून पद् मश्री पुरस्कार प्राप्त मा. श्री. चैत्राम पवार तसेच सन्माननीय अतिथी म्हणून पद् मश्री पुरस्कार प्राप्त मा. श्री. पोपटराव पवार, नाशिकचे विभागीय आयुक्त मा. डॉ. प्रविण गेडाम, नाशिकचे जिल्हाधिकारी मा. श्री. आयुष प्रसाद उपस्थित राहणार आहेत अशी माहिती कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी दिली. या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ व विद्यापीठ विविध प्राधिकरणाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थितीत राहणार आहेत. यावेळी संलग्नित महाविद्यालयातील विविध विद्याशाखेच्या प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील प्रथम आलेल्या वैद्यकीय विद्याशाखाच्या सात तसेच दंत विद्याशाखेच्या तीन तसेच आयुर्वेद व युनानी विद्याशाखेच्या सहा तसेच होमिओपॅथी विद्याशाखेच्या पाच तसेच परिचर्या विद्याशाखेच्या चार तसेच फिजिओथेरपी, बी.पी.ओ. आणि ऑक्युपेशनल थेरपीच्या नऊ तसेच स्पीच आणि लँग्वेज शाखेच्या तीन अशा एकूण सद् तीस गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक प्रदान करण्यात येणार आहेत तसेच विद्यापीठातर्फे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार, उत्कृष्ट खेळाडू विद्यार्थी पुरस्कार, राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार, सांस्कृतिक पुरस्कार आणि विशेष सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. विद्यापीठाचा २८ वा वर्धापन दिन समारंभाचे विद्यापीठ आवारातील शिक्षक प्रशिक्षण प्रबोधिनीच्या धन्वंतरी सभागृहात सकाळी ११.०० वाजता आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तीचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

याप्रसंगी दुसऱ्या सत्रात विद्यार्थी व कर्मचारी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी विद्यापीठाच्या वर्धापन दिन समारंभास मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात येत आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० जून २०२६

# तुकाराम मुंडे  राजकीय आयकॉन का होत नाही?

**म**हाराष्ट्र हा संतांचा, समाजसुधारकांचा, क्रांतिकारकांचा आणि बंडखोर विचारांचे राज्य म्हणून ओळखला जाते. महात्मा फुले , राजर्षी शाहू महाराज ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ही भूमी आहे. या भूमीने अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद साहस दिले आहे. पण आज प्रश्न पडतो की, हा तोच महाराष्ट्र आहे का?आजचा महाराष्ट्र विचित्र विरोधाभासत अडकलेला आहे. तोंडाने परिवर्तनाची भाषा, पण कृतीत जुन्याच साखळदंडांची पूजा. भाषणात क्रांती, पण मतदानात परंपरागत गुलामी. सोशल मीडियावर संताप, पण प्रत्यक्ष आयुष्यात तडजोड. तामिळनाडूमध्ये राजकीय परिवर्तन झालं कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसणारा विजय थलपती काल्पनिक अशा चित्रपटातून राजकीय क्षेत्रात उभा राहतो तामिळनाडूसह भारतातील आणि महाराष्ट्रमध्येही राज्यात कोण थलपती होऊ शकतो अशी  चर्चा रंगते मात्र यात तीच तीच नावे आणि तेच तेच चेहरे समोर आणले जातात. जी या व्यवस्थेला लागलेली कीड आहे. जी या व्यवस्थेच्या बरबटतेस कारण ठरलेली आहे. "महाराष्ट्राचा थलपती कोण?" हा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे, त्यापेक्षा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.महाराष्ट्राला खरोखर थलपती हवा आहे का? अनेकांसाठी तो केवळ अभिनेता नाही तर तामिळनाडूमध्ये प्रस्थापित व्यवस्थेविरोधातील असंतोषाचा चेहरा आहे. महाराष्ट्र ही याच वाटेवर आहे. त्यामुळेच उत्स्फूर्तपणे महाराष्ट्रातही हा प्रश्न विचारला गेला. सोशल मीडियावर अनेक नावे पुढे आली.मात्र तामिळनाडू जनतेइतका शहाणपणा यात नव्हता. काहींनी घराणेशाहीच्या वारसदारांची नावे घेतली. काहींनी जातीच्या गणितातून नेते शोधले. तर काहींनी पक्षनिष्ठेच्या चष्म्यातून भविष्य पाहिले. पण महाराष्ट्रला एक नवी दिशा देऊ शकणारा पारदर्शक निर्भीड निस्वार्थी असे एक नाव निश्चितच आहे ते नाव म्हणजे तुकाराम मुंढे. पण हे नाव फारसे पुढे आले नाही हीच खरी महाराष्ट्राची शोकांतिका आहे. खरतर महाराष्ट्रातील सर्व विचारवंतांनी सामाजिक कार्यकर्ते यांनीयावर भाष्य करायला हवे होते. पण  हे नाव पुढे का नाही आलं यावरती चिंतन करणे आवश्यक आहे. हवा तर यावरती अनेक परिषदा, कार्यशाळा हा महाराष्ट्रातील विचारवंत म्हणणाऱ्या लोकांचा आवडता छंद म्हणून का असेना यावर घ्यायला हव्या. हा प्रश्न तुकाराम मुंडे यांच्यापेक्षा महाराष्ट्राच्या मानसिकतेबद्दल अधिक अधोरेखित करणारा आहे.आपल्याकडे राजकीय नायक निवडताना कार्यक्षमतेपेक्षा आडनाव पाहिले जाते. कर्तृत्वापेक्षा वंश, जात पाहिली जाते. संघर्षापेक्षा वारसा पाहिला जातो. जनहितापेक्षा गटहित पाहिले जाते. म्हणजेच ज्वाजल्य इतिहासात त्याला घुसडविता आले पाहिजे. महाराष्ट्रात राजकारणाचा सर्वात मोठा उद्योग कोणता असेल तर तो म्हणजे राजकीय प्रतिमानिर्मितीचा उद्योग. एखादा नेता जन्माला येण्याआधी त्याचे पोस्टर तयार असते. त्याच्या कामापेक्षा त्याची प्रसिद्धी मोठी असते.या वातावरणात एखादा अधिकारी नियमांनुसार काम करतो, दबावाला झुकत नाही, कोणत्याही गटाची दलाली करत नाही, तर तो लोकांना आवडतो; पण त्याला राजकीय नेता म्हणून व्यवस्था स्वीकारत नाही. हे पुरोगामी म्हणून टेम्भा मिळवणारे महाराष्ट्रात का बर होत असावे.जेव्हा जेव्हा त्यांनी कठोर कारवाई केली, तेव्हा ते चर्चेत आले. जेव्हा जेव्हा त्यांची बदली झाली, तेव्हा लोकांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहिल्या. काही दिवस संताप व्यक्त झाला. मग पुन्हा सगळे शांत झाले. पुन्हा नवीन विषय आला. पुन्हा नवीन वाद आला. आणि महाराष्ट्राने आपल्या स्मरणशक्तीप्रमाणेच आपला संतापही विसरला.खरे तर प्रश्न बदलीचा नाही. प्रश्न असा आहे की प्रत्येक वेळी बदली झाल्यावर हळहळणारा समाज, व्यवस्थेच्या स्वरूपाबद्दल गंभीर चर्चा का करत नाही?आपल्याला प्रामाणिक अधिकारी आवडतात; पण प्रामाणिक राजकीय व्यवस्था हवी असते का? की राजकीय व्यवस्थेला वेगवेगळ्या संदर्भाची किनार आहे? आपल्याला भ्रष्टाचाराविरोधी भाषणे आवडतात; पण भ्रष्टाचाराला पोसणाऱ्या राजकीय संस्कृतीविरोधात उभे राहण्याची तयारी असते का?आपल्याला स्वच्छ प्रतिमा आवडते; पण स्वच्छ राजकारणासाठी किंमत मोजण्याची तयारी असते का?महाराष्ट्रातील तरुणांचा संताप खरा आहे. बेरोजगारी आहे. शेतकरी संकटात आहे. शिक्षण महाग झाले आहे. स्पर्धा वाढली आहे. संधी कमी झाल्या आहेत. पण या संतापाचे रूपांतर संघटित सामाजिक आणि राजकीय शक्तीत होताना दिसत नाही.कारण आपण अजूनही राजकीय नायक शोधत आहोत. नायक शोधण्याचा नेमका आधार काय आहे यावरही चिंतन होणे आवश्यक आहे?खरे तर महाराष्ट्रात जर एखादे नाव प्रामाणिकपणा, शिस्त, कठोर प्रशासन आणि जनहितासाठी निर्भीड निर्णय यासाठी पुढे येत असेल, तर ते नाव तुकाराम मुंडे यांचे आहे.पण दुर्दैवाने कोणीही हे नाव पुढे राजकीय नेत्याच्या यादीत आणले नाही. नायक चित्रपटातील शिवाजीराव होण्याचे धाडस ताकद जर कोनात असेल तर ती तुकाराम मुंडे यांच्यात आहे.हे कोणीही निर्विवाद मान्य करेल.कारण यापूर्वी महाराष्ट्रात अनेक आयएएस अधिकारी राजकारणात आले. त्यांनी काय दिवे लावले हे सर्वश्रुत आहे. काहींना राजकीय पक्षांनी पुढे केले, काही स्वतःहून सत्तेच्या केंद्रात पोहोचले. अनेकांनी सत्तेचा वापर करून राजकीय कारकीर्द घडवली. काहींनी समाजकारणाच्या नावाखाली स्वतःची राजकीय दुकाने उघडली. पण एक प्रश्न कायम राहतो यात अनेक आय ए. एस अधिकारी यांनी त्यांच्या काळात राजकीय पक्षाच्या हिताचे निर्णय घेतले म्हणून त्यांना त्यांच्या गॉडफादरने शाबासकी म्हणून राजकीय बक्षीस दिले गेले. या सगळ्यांना तुकाराम मुंडे  पचत नाहीत. कारण तुकाराम मुंडे हे कोणत्याही राजकीय गॉडफादरचे उत्पादन नाहीत. त्यांनी स्वतःची प्रतिमा सत्तेच्या दलालीतून नाही तर संघर्षातून उभी केली आहे.यामुळेच ते केवळ अधिकारी राहत नाहीत; ते व्यवस्थेतील ढोंग, संधीसाधूपणा आणि सत्तेच्या दलालीवर उभ्या राहिलेल्या संस्कृतीला विचारलेला अस्वस्थ करणारा प्रश्न बनतात.याच ठिकाणी खरा प्रश्न उभा राहतो तुकाराम मुंडे हे तरुणाईचे राजकीय आयकॉन का होत नाहीत?महाराष्ट्रातील तरुणांनी जर खरोखरच स्वच्छ, पारदर्शक आणि जनहितवादी राजकारणाची मागणी करायची असेल, तर अशा व्यक्तिमत्त्वांना केवळ टाळ्या वाजवून चालणार नाही. त्यांना नेतृत्वाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी सामाजिक आणि राजकीय दबाव निर्माण करावा लागेल.त्यांच्या बदलीबाबत हळहळ व्यक्त करण्यापेक्षा त्यांनाच सत्ता का नको अशी कळवळ करायला हवी. आजपर्यंत या पक्षाला घालवून तो पक्ष.. त्या पक्षाला घालवून हा पक्ष अशी अदलाबदली खूप वेळा झाली. पण एकदा आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तुकाराम मुंडेच व्हायला हवे अशी मोहीम राबवून त्यांनाच बदलीचा आदेश देणारा बनवल पाहिजे. एका विभागात गेल्यावर काही दिवसात, तासात ते अनेकांना सरळ करतात त्यांच्या हातात महाराष्ट्र दिला तर काय होईल यांची कल्पना आपण नक्कीच करू शकतो.. पण यासाठी इच्छाशक्ती हवी आहे.. यासाठी जातीच्या राजकारणात आंघोळ करणाऱ्या विचारवंतांनी स्वतःची झोळी रिकामी राहिली तरी चालेल पण महाराष्ट्र खऱ्या अर्थाने नव्याने उभा राहायला हवा असा विचार करायला हवा.इतिहास सांगतो की समाज झोपलेला असेल तर कोणताही नायक त्याला वाचवू शकत नाही. आणि समाज जागा झाला तर सामान्य माणूसही इतिहास घडवू शकतो. पण इतिहास घडवणारा नायक ही आपलाच असायला हवा मग तो कसा का असेना या मानसिकतेतुन बाहेर पडायला हवं.म्हणूनच महाराष्ट्रातील तथाकथित विचारवंतांनाही एक प्रश्न विचारला पाहिजे. परिवर्तनाच्या घोषणा करणारे, पुरोगामित्वाचे धडे देणारे, सामाजिक न्यायाची भाषा करणारे, लोकशाहीचे रक्षणकर्ते म्हणून स्वतःची प्रतिमा उभी करणारे अनेक सामाजिक, राजकीय विचारवंत म्हणून समाजात मिरणारे लोक आज सार्वजनिक चर्चेत सक्रिय आहेत. पण जेव्हा व्यवस्थेतील प्रामाणिकता, उत्तरदायित्व आणि कठोर प्रशासन यांचा प्रश्न येतो, तेव्हा त्यांची भूमिका अनेकदा संदिग्ध का दिसते? हे व्यवस्थेचे गुलाम आहेत की स्वसमूहश्रेष्ठता वादाचे गुलाम आहेत हे सुद्धा विचारणे गरजेचे आहे?हे प्रश्न केवळ एका व्यक्तीविषयी नाहीत. हे प्रश्न त्या मूल्यांविषयी आहेत ज्यांची चर्चा आपण सतत करतो, पण ज्यांची अंमलबजावणी होताना दिसली की अस्वस्थ होतो. महाराष्ट्राचे दुर्दैव हे आहे की येथे चांगल्या लोकांबद्दल बोलणारे खूप आहेत; पण त्यांच्या मागे उभे राहणारे कमी आहेत. येथे क्रांतीची भाषा आहे; पण क्रांतीची किंमत मोजण्याची तयारी नाही.येथे परिवर्तनाची घोषणा आहे; पण परिवर्तनासाठी आवश्यक त्याग नाही.येथे व्यवस्था बदलण्याची इच्छा व्यक्त केली जाते; पण व्यवस्था टिकवून ठेवणाऱ्या सवयी सोडल्या जात नाहीत.आणि म्हणूनच तुकाराम मुंढे महाराष्ट्राला पचत नाही.. तुकाराम मुंडे का पचत नाही याचं नेमका काय आधार आहे हे सुद्धा शोधायला हवे.कारण कोणताही नेता, कोणताही अधिकारी, कोणताही पक्ष किंवा कोणतीही विचारसरणी महाराष्ट्राला वाचवू शकत नाही, जोपर्यंत महाराष्ट्र स्वतःला बदलण्याचा निर्णय घेत नाही.तुकाराम मुंडे यांच्याबद्दल लोकांच्या मनात आदर असू शकतो, मतभेद असू शकतात, समर्थन असू शकते. पण महाराष्ट्राच्या हितासाठी त्यांच्याशिवाय पर्याय नाही हे सुद्धा निर्विवाद सगळेच मान्य करतील.पण प्रश्न आहे आपल्याला खरोखर प्रामाणिक नेतृत्व हवे आहे का?जर उत्तर होय असेल, तर महाराष्ट्राने व्यक्तिपूजेच्या पलीकडे जाऊन मूल्यांची बाजू घ्यावी लागेल.आणि जर उत्तर नाही असेल, तर मग प्रत्येक निवडणुकीनंतर, प्रत्येक घोटाळ्यानंतर, प्रत्येक बदलीनंतर आणि प्रत्येक निराशेनंतर रडण्याचा नैतिक अधिकारही आपल्याला नाही. इतिहास एक गोष्ट शिकवतो..समाज बदलण्याची तयारी नसताना परिवर्तनाची स्वप्ने पाहणारे लोक शेवटी नायकांच्या शोधात हरवून जातात.आणि समाज जागा झाला की नायक शोधावे लागत नाहीत ते समजातून उभे राहतात.फक्त आम्हाला हे नायक सोशल मीडियाने फुगवलेले नको तर जमिनीवर उभे राहुन जगणारे हवे आहे. महाराष्ट्र तुकाराम मुंडे यांना अधिकारी म्हणून स्वीकारेल पण राजकीय नेता म्हणून स्वीकारेल का..? तेवढी राजकीय परिपक्वता आणि प्रगल्भता महाराष्ट्रातील ढोंगी पुरोगामी राज्यात शक्य आहे का? जर उत्तर "होय" असेल, तर महाराष्ट्राने केवळ नायक शोधणे थांबवून परिवर्तनाची ताकद स्वतःमध्ये निर्माण केली पाहिजे.

महाराष्ट्रातील सर्वच विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, पुरोगामी कामयुनिस्ट या सगळ्यांनी महाराष्ट्र वाचावायचा असेल तर तुकाराम मुंडे यांनी राजकारणात यावं अशी गळ त्यांना घालायला हवी होती. पण सगळेच याबाबत ब्र शब्द कधी काढत नाही हे एक गौडबंगालच आहे.

**श्री. अभय जायभाये**
**९९२३५७५५०१**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० जून २०२६


## गुलमोहर

लाल केशरी रंगांनी
बहरला गुलमोहर
रस्त्याच्या कडेला
दिसतो किती सुंदर

उन्हाच्या कळा सोसूनी
देतो गार छाया
सर्वांवर करतो तो
जीवापाड माया

लाल केशरी रंगांनी
झाला छान साकार
निसर्गाने बहाल केला
जणू छत्रीचा आकार

भटकंती करून पक्षी
रात्रभर विसावा घेती
मायेचा ओलावा देऊन
गुलमोहर जपतो नाती

उन पावसात गुलमोहर
ताठ मानेनं उभा
आपणास सांगतो जणू
संकटाशी लढत जगा




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


## धारा मृगाच्या पडता

काळया ढगांना पाहून
मोर पिसारा खोलतो
धारा मृगाच्या पडता
सारा शिवार फुलतो. १

पहिल्याच पावसाने
माती सुगंधित झाली
रान हिरव्या रंगाचे
शालं पांघरून आली. २

धारा मृगाच्या पडता
पोरं मारतात उड्या
आनंदात पोरं म्हणे
मूगभजे खाऊ गड्या. ३

धारा पिऊन मृगाच्या
तृष्णा चातक भागवी
पावसात भिजताना
बापू मुलांना रागवी. ४

धारा मृगाच्या पिऊन
माती गंधाळून गेली
शेती शिवारात पहा
नटू लागतात वेली. ५

थेंब पडता रानात
झाले शिवार हिरवे
गीत गाती आनंदाने
झाडी बसून पारवे. ६


**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


# नेत्रदान : प्रकाशाचा अमूल्य वारसा

**मा**नवी शरीरातील प्रत्येक अवयव महत्त्वाचा असला तरी डोळ्यांचे स्थान सर्वाधिक अनन्यसाधारण आहे. डोळे हे केवळ शरीराचा एक अवयव नसून ते ज्ञान, अनुभव, सौंदर्य आणि जगाशी संवाद साधण्याचे माध्यम आहेत. या डोळ्यांमुळेच माणूस निसर्गातील विविध रंग अनुभवतो, आपल्या प्रिय व्यक्तींचे चेहरे पाहतो, शिक्षण घेतो, काम करतो आणि जीवनातील असंख्य आनंदाचे क्षण अनुभवतो. दृष्टी ही मानवाला लाभलेली एक अनमोल देणगी आहे. ज्यांच्या डोळ्यांतून जगाचे दर्शन घडते, त्यांना दृष्टीचे महत्त्व कदाचित नेहमी जाणवत नाही; परंतु ज्यांनी दृष्टी गमावली आहे किंवा ज्यांना जन्मतःच अंधत्व लाभले आहे, त्यांच्यासाठी दृष्टी म्हणजे संपूर्ण आयुष्य बदलून टाकणारी शक्ती असते. अशा लाखो अंध आणि दृष्टीदोषग्रस्त व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणण्याची क्षमता नेत्रदानामध्ये आहे. म्हणूनच दरवर्षी १० जून रोजी जागतिक नेत्रदान दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ जनजागृतीचा कार्यक्रम नसून मानवतेचा, सामाजिक जबाबदारीचा आणि परोपकाराचा संदेश देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतर एखाद्या व्यक्तीच्या डोळ्यांतील कॉर्निया किंवा नेत्रपटल दान करणे. कॉर्निया हा डोळ्याचा सर्वात बाहेरील पारदर्शक भाग असून तो प्रकाश डोळ्याच्या आत पोहोचवण्याचे काम करतो. कॉर्नियामध्ये दोष निर्माण झाल्यास व्यक्तीला अंशतः किंवा पूर्ण अंधत्व येऊ शकते. आधुनिक वैद्यकीय विज्ञानामुळे अशा रुग्णांवर कॉर्निया प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करून त्यांची दृष्टी पुन्हा मिळवून देता येते. मृत्यूनंतर दान केलेल्या एका व्यक्तीच्या दोन्ही डोळ्यांमधील कॉर्निया दोन वेगवेगळ्या व्यक्तींना उपयोगी पडू शकतात. त्यामुळे एका व्यक्तीच्या नेत्रदानातून दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो. म्हणूनच नेत्रदानाला "महादान" असेही म्हटले जाते.दृष्टी ही व्यक्तीच्या जीवनमानाशी थेट संबंधित असते. एखादी व्यक्ती दृष्टी गमावते तेव्हा तिच्या जीवनातील अनेक शक्यता मर्यादित होतात. शिक्षण, रोजगार, प्रवास, सामाजिक संबंध आणि दैनंदिन जीवनातील अनेक कामे कठीण बनतात. अंधत्वामुळे व्यक्तीला मानसिक, सामाजिक आणि आर्थिक समस्यांनाही सामोरे जावे लागते. अनेकदा कुटुंबातील इतर सदस्यांवरही त्याचा परिणाम होतो. अशा परिस्थितीत नेत्रदानाद्वारे मिळालेली दृष्टी केवळ एका व्यक्तीच्या डोळ्यांमध्ये प्रकाश आणत नाही, तर त्याच्या संपूर्ण जीवनात आशेची नवी पहाट निर्माण करते. त्यामुळे नेत्रदान हे केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवतेचे श्रेष्ठ उदाहरण आहे.जगभरात अंधत्व ही एक गंभीर आरोग्य समस्या मानली जाते. विविध आंतरराष्ट्रीय अभ्यासांनुसार कोट्यवधी लोक काही ना काही प्रकारच्या दृष्टीदोषाने ग्रस्त आहेत. त्यापैकी लाखो लोक कॉर्नियाच्या आजारांमुळे अंधत्व अनुभवत आहेत. अनेकांना कॉर्निया प्रत्यारोपणाची गरज असते; परंतु दानासाठी उपलब्ध होणाऱ्या कॉर्नियांची संख्या अत्यल्प असल्यामुळे हजारो रुग्ण प्रतीक्षा यादीत राहतात. भारतामध्येही ही समस्या मोठ्या प्रमाणावर आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अंधत्व आणि दृष्टीदोषाचे प्रमाण मोठे असून कॉर्नियाच्या अंधत्वामुळे अनेक व्यक्तींचे जीवन प्रभावित झाले आहे. देशभरात दरवर्षी लाखो कॉर्नियांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात उपलब्ध होणाऱ्या नेत्रांची संख्या त्यापेक्षा खूपच कमी आहे. ही तफावत दूर करण्यासाठी व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे.भारतातील नेत्रदान चळवळीचा इतिहास प्रेरणादायी आहे. विसाव्या शतकाच्या मध्यापासून नेत्रदान आणि कॉर्निया प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती झाली. विविध वैद्यकीय संस्था, नेत्ररोगतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्थांनी नेत्रदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. देशातील अनेक शहरांमध्ये आय बँकांची स्थापना करण्यात आली. आय बँक म्हणजे नेत्रदानातून प्राप्त झालेले कॉर्निया सुरक्षित ठेवण्याची, त्यांची तपासणी करण्याची आणि योग्य रुग्णांना उपलब्ध करून देण्याची व्यवस्था होय. या संस्थांमुळे नेत्रदान आणि प्रत्यारोपण प्रक्रिया अधिक प्रभावी बनली आहे. तरीही लोकसंख्येच्या तुलनेत नेत्रदानाचे प्रमाण वाढविण्याची गरज कायम आहे.नेत्रदानाच्या संदर्भात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते मृत्यूनंतर केले जाते. जिवंत असताना व्यक्तीला कोणतीही शारीरिक हानी न होता ती नेत्रदानाचा संकल्प करू शकते. व्यक्तीच्या मृत्यूनंतर साधारणपणे चार ते सहा तासांच्या आत प्रशिक्षित वैद्यकीय पथक कॉर्निया संकलित करते. ही प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक आणि सन्मानपूर्वक केली जाते. मृतदेहाचे विद्रूपीकरण होत नाही, चेहऱ्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही आणि अंत्यदर्शन किंवा धार्मिक विधींमध्ये कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे नेत्रदानाबाबत असलेली भीती किंवा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे.समाजामध्ये नेत्रदानासंदर्भात अनेक गैरसमज आजही आढळतात. काही लोकांना वाटते की नेत्रदान केल्याने पुढील जन्मात अंधत्व येऊ शकते. काहींना असे वाटते की मृतदेहाचा अपमान होतो किंवा धार्मिक परंपरांचा भंग होतो. काही लोकांना नेत्र काढण्याच्या प्रक्रियेची भीती वाटते. प्रत्यक्षात या सर्व समजुती निराधार आहेत. जगातील प्रमुख धर्म मानवसेवा, परोपकार आणि दान यांना सर्वोच्च स्थान देतात. कोणताही धर्म नेत्रदानाला विरोध करत नाही. उलट दुसऱ्याला दृष्टीदान देणे हे अत्यंत पुण्याचे कार्य मानले जाते. त्यामुळे धार्मिक किंवा सांस्कृतिक कारणांमुळे नेत्रदान टाळण्याचे कोणतेही कारण नाही.भारतीय संस्कृतीमध्ये दानधर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अन्नदान, वस्त्रदान, विद्यादान, रक्तदान यांसारख्या अनेक दानपरंपरा आपल्या समाजात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. नेत्रदान ही या दानपरंपरेची आधुनिक आणि अत्यंत प्रभावी अभिव्यक्ती आहे. मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याची क्षमता या दानामध्ये आहे. त्यामुळे नेत्रदान ही केवळ वैद्यकीय गरज नसून सामाजिक आणि नैतिक जबाबदारीदेखील आहे.अंधत्वाचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. कुटुंबातील इतर सदस्यांनाही त्याचा मोठा फटका बसतो. अंध व्यक्तीला दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या संधी कमी होतात. काही वेळा कुटुंबातील एखाद्या सदस्याला त्याची काळजी घेण्यासाठी स्वतःच्या करिअरमध्ये तडजोड करावी लागते. अशा परिस्थितीत जर त्या व्यक्तीला कॉर्निया प्रत्यारोपणाद्वारे दृष्टी मिळाली तर संपूर्ण कुटुंबाचे जीवन बदलू शकते. त्यामुळे नेत्रदानाचा लाभ केवळ एका व्यक्तीला नाही तर संपूर्ण समाजाला मिळतो.विशेषतः बालकांमध्ये नेत्रदानाचे महत्त्व अधिक आहे. लहान वयात कॉर्नियाशी संबंधित अंधत्व आल्यास मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक विकासावर गंभीर परिणाम होतो. दृष्टीअभावी त्यांना शिक्षण घेणे, खेळणे आणि सामाजिक कौशल्ये विकसित करणे कठीण जाते. योग्य वेळी कॉर्निया प्रत्यारोपण झाल्यास अशा मुलांचे जीवन पूर्णपणे बदलू शकते. ते इतर मुलांप्रमाणे शिक्षण घेऊ शकतात, करिअर घडवू शकतात आणि समाजात स्वाभिमानाने जगू शकतात. म्हणूनच नेत्रदान हे भविष्य घडविणारे दान मानले जाते.जागतिक नेत्रदान दिनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करणे. अनेक लोकांना नेत्रदानाची प्रक्रिया, त्याचे फायदे आणि त्यामागील वैज्ञानिक सत्य यांची माहिती नसते. त्यामुळे विविध शासकीय संस्था, आरोग्य विभाग, वैद्यकीय महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्था या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. जनजागृती रॅली, व्याख्याने, चर्चासत्रे, नेत्रतपासणी शिबिरे, निबंध स्पर्धा आणि सामाजिक माध्यमांवरील मोहिमा यांद्वारे लोकांपर्यंत संदेश पोहोचविला जातो. या उपक्रमांमुळे समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होते.ग्रामीण भारतामध्ये नेत्रदानाविषयी जागरूकतेचा अभाव तुलनेने अधिक आहे. अनेक गावांमध्ये आय बँकांची माहिती उपलब्ध नसते. काही ठिकाणी अंधश्रद्धा आणि गैरसमज अधिक प्रमाणात आढळतात. त्यामुळे ग्रामीण भागात विशेष मोहिमा राबविण्याची गरज आहे. आशा सेविका, अंगणवाडी कार्यकर्त्या, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून जनजागृती वाढविता येऊ शकते. ग्रामीण समाजामध्ये विश्वासार्ह स्थान असलेल्या व्यक्तींनी नेत्रदानाचा प्रचार केल्यास त्याचा अधिक परिणाम होऊ शकतो.शिक्षण क्षेत्राची भूमिकाही या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना नेत्रदानाविषयी माहिती देणे आवश्यक आहे. युवक वर्ग हा समाजातील परिवर्तनाचा प्रमुख घटक आहे. जर तरुण पिढीने नेत्रदानाचा स्वीकार केला, तर भविष्यात नेत्रदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढू शकते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करून अंधश्रद्धा दूर करण्याचे काम शिक्षण संस्थांमार्फत प्रभावीपणे करता येते.प्रसारमाध्यमे ही जनजागृतीची प्रभावी साधने आहेत. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांद्वारे नेत्रदानाविषयी माहिती व्यापक प्रमाणात पोहोचविता येते. यशस्वी कॉर्निया प्रत्यारोपण झालेल्या व्यक्तींच्या कथा समाजापर्यंत पोहोचवल्यास लोकांमध्ये प्रेरणा निर्माण होते. एखाद्या व्यक्तीने पुन्हा आपल्या आई-वडिलांचा चेहरा पाहिला, आपल्या मुलांना पाहिले किंवा अनेक वर्षांनंतर निसर्गाचा अनुभव घेतला, अशा कथा लोकांच्या मनाला स्पर्श करतात आणि नेत्रदानाबाबत सकारात्मक विचार निर्माण करतात.वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज कॉर्निया प्रत्यारोपणाची यशस्वीता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अत्याधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञान, सुधारित जतन पद्धती आणि प्रशिक्षित तज्ज्ञांमुळे अनेक रुग्णांना उत्तम परिणाम मिळत आहेत. त्यामुळे नेत्रदानातून मिळणाऱ्या लाभांची व्याप्ती अधिक वाढली आहे. भविष्यात जैवतंत्रज्ञान आणि संशोधनामुळे या क्षेत्रात आणखी प्रगती होण्याची अपेक्षा आहे. तथापि, कोणतेही तंत्रज्ञान उपलब्ध असले तरी दानासाठी आवश्यक कॉर्निया मिळाले नाहीत तर प्रत्यारोपण शक्य होणार नाही. म्हणूनच नेत्रदानाची गरज कायम महत्त्वाची राहणार आहे.नेत्रदानाचा निर्णय वैयक्तिक असला तरी त्याची अंमलबजावणी कुटुंबाच्या सहकार्यावर अवलंबून असते. अनेक वेळा व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केलेला असतो; परंतु मृत्यूनंतर कुटुंबीयांना त्याची माहिती नसल्यामुळे दान होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कुटुंबीयांशी या विषयावर चर्चा करणे आवश्यक आहे. मृत्यूनंतर आपले नेत्र दान करण्याची इच्छा स्पष्टपणे व्यक्त करणे गरजेचे आहे. अशा संवादामुळे कुटुंबीयही या निर्णयाचा सन्मान करण्यास तयार होतात.समाजातील प्रसिद्ध व्यक्तींची भूमिका देखील महत्त्वाची आहे. कलाकार, साहित्यिक, क्रीडापटू, सामाजिक कार्यकर्ते आणि धार्मिक नेते यांनी नेत्रदानाचा संदेश दिल्यास त्याचा व्यापक प्रभाव पडतो. अनेक लोक आपल्या आदर्श व्यक्तींचे अनुकरण करतात. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी नेत्रदानाविषयी खुलेपणाने भूमिका मांडणे आवश्यक आहे. त्यांच्या सहभागामुळे जनजागृती मोहिमांना अधिक बळ मिळू शकते.नेत्रदान आणि मानवता यांचा अतूट संबंध आहे. माणूस आपल्या आयुष्यात अनेक प्रकारे समाजासाठी योगदान देतो; परंतु मृत्यूनंतरही समाजाच्या सेवेसाठी काहीतरी देऊन जाण्याची संधी फार कमी क्षेत्रांमध्ये उपलब्ध असते. नेत्रदान ही अशीच एक संधी आहे. जीवनाचा शेवट हा दुसऱ्या कोणाच्या नव्या सुरुवातीचे कारण ठरू शकतो. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिचे नेत्र दोन अंध व्यक्तींना प्रकाश देऊ शकतात, ही कल्पनाच किती प्रेरणादायी आहे.आजच्या काळात नेत्रदानाबाबतची माहिती मिळविणे आणि नोंदणी करणेही सोपे झाले आहे. विविध शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. तथापि, केवळ नोंदणी करून थांबणे पुरेसे नाही. समाजामध्ये या विषयावर संवाद वाढविणे, इतरांना प्रेरित करणे आणि नेत्रदानाच्या चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप देणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक कुटुंब आणि प्रत्येक संस्था या कार्यात सहभागी झाली तर अंधत्वाविरुद्धची लढाई अधिक प्रभावी ठरू शकते.जागतिक नेत्रदान दिन हा आपल्याला आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. दृष्टी ही जीवनातील अमूल्य संपत्ती आहे आणि ती दुसऱ्याला देण्याची संधी नेत्रदानामध्ये आहे. आपण जिवंत असताना समाजासाठी जे काही करतो, त्यापलीकडे जाऊन मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची ताकद या दानामध्ये आहे. त्यामुळे नेत्रदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नाही, तर ती मानवतेचा उत्सव आहे.मानवजातीच्या इतिहासात दान, त्याग आणि परोपकार यांना नेहमीच सर्वोच्च स्थान मिळाले आहे. नेत्रदान ही त्या परंपरेची आधुनिक अभिव्यक्ती आहे. एखाद्या अंध व्यक्तीच्या डोळ्यांत पुन्हा प्रकाश निर्माण करणे, त्याला स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची संधी देणे यापेक्षा मोठी मानवसेवा कोणती असू शकते? म्हणूनच प्रत्येकाने नेत्रदानाचा गांभीर्याने विचार करावा. आपल्या कुटुंबीयांशी याबाबत चर्चा करावी आणि समाजामध्येही या विषयाची जागरूकता वाढवावी.अखेरीस असे म्हणता येईल की, नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतरही जिवंत राहण्याचा एक सुंदर मार्ग आहे. शरीर नश्वर असले तरी आपल्या नेत्रांमधून निर्माण झालेला प्रकाश अनेक वर्षे दुसऱ्यांच्या आयुष्यात झळकत राहू शकतो. अंधाराने वेढलेल्या एखाद्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे, हीच नेत्रदानाची खरी ताकद आहे. जागतिक नेत्रदान दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया की दृष्टीचा हा अमूल्य वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि अंधत्वमुक्त समाज घडविण्यासाठी नेत्रदानाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत नेऊया. कारण मृत्यूनंतरही जर आपले डोळे कोणाच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणार असतील, तर त्यापेक्षा मोठे दान आणि त्यापेक्षा मोठी मानवसेवा दुसरी कोणतीच असू शकत नाही.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**
**ईमेल - bagate.rajendra5@gmail.com**



## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |